लग्न मंडपात
सारे गाव पेटले
कारण काय म्हणे तर
त्या नवऱ्याने नवरीऐवजी
करवलीचे नाव घेतले
www.meemarathi.tv

मी मनसोक्त रडून घेतो
घरात कुणी नसल्यावर
मग सहज हसायला जमतं
चारचौघात बसल्यावर
www.meemarathi.tv

नेमका जो विषय टाळायचा
तोच आपण काढतो
आणि वादाच्या रूपाने का होईना
आपल्या भेटीचा वेळ वाढतो
www.meemarathi.tv

मनामध्ये असू द्यावा
एक आठवणींचा कप्पा
म्हणजे हवं तेव्हा मारता येतात
दूर गेलेल्यांशी गप्पा

www.meemarathi.tv

हसायच्या आधी मला
जरा सराव करावा लागतो
मनावरचा घाव
दाबून धरावा लागतो

www.meemarathi.tv

आपण त्याची सोबत धरावी
ज्याला आपण आवडतो
नाहीतर आपण आपल्या आवडीसाठी
उगीच आयुष्य दवडतो

www.meemarathi.tv

तू किनारा गाठलास
तर मी तुझ्याबरोबर आहे
आणि तळाशी गेलास
तर तुझ्या अगोदर आहे

www.meemarathi.tv

डोळ्यांतून अश्रू ओघळला
की तोही आपला राहत नाही
वाईट याचंच वाटतं की
दुःख त्याच्या सोबत वाहत नाही

www.meemarathi.tv

गावातले सगळे रस्ते
रात्री गावाबाहेर पडतात
मला घरीच परतायचं असतं
पण ते मला रानात नेऊन सोडतात

www.meemarathi.tv

घरात काळोख शिरेल म्हणून
मी सगळी दारं लावून बसलो
आणि स्वतःच्या खुळेपणावर
अंधारात बसून हसलो.

www.meemarathi.tv

नसते उगीच भास होतात
तू यायची असलीस की
मग डोळे म्हणतात हा भासच आहे
तू येताना दिसलीस की

www.meemarathi.tv

पावसावरच्या निबंधाला
कधीच पूर्ण मार्क मिळत नाहीत
कारण मार्क देणारा आणि घेणारा
दोघांनाही तो कळत नाही

www.meemarathi.tv

तू असं काही पाहिलसं की वाटलं
खरंच पाऊस पडायला हवा
मी अंग चोरताना तुझा
धिटाईचा स्पर्श घडायला हवा

www.meemarathi.tv

चिंब भिजल्यावर तहान लागते ना
तसं होतं तुला भेटल्यावर
तुलाच पहात रहावस वाटतं
तुझ्या कुशीत मिटल्यावर

www.meemarathi.tv

मेल्यावर काय होतं
हे मेल्याशिवाय कळतं नाही
पण जगून काय केलं याचं उत्तर
बरेचदा मेल्यावरही मिळत नाही

www.meemarathi.tv

घराच्या भिंती पडल्यावर
मला क्षितिज दिसायला लागलं
भांबावलेलं मन माझं
अलगद हसायला लागलं

www.meemarathi.tv

तू हाक मारलीस तर
मला मागे परतायला जमेल
पण प्रश्न हा आहे की..
तुला हाक मारायला जमेल ?

www.meemarathi.tv